# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Pudhari 14-03-2016**



बेळगाव : यु. एन. कालकुंद्रीकर यांच्याकडे करारपत्र सुपूर्द करताना प्रा. सतीश हुक्केरी शेजारी डॉ. ए. एस. देशपांडे व अन्य.

### जीआयटी महाविद्यालय-गेट संस्थेमध्ये प्रशिक्षण करार

**बेळगाव (प्रतिनिधी) :** कर्नाटक लॉ सोसायटीच्या गोगटे अभियांत्रिकी महाविद्यालयाला एज्यु टेक कॉन सील्युशन इंडिया ईटीसी यांच्यामार्फत प्रशिक्षणासंदर्भात नुकतेच करारपत्र सुपूर्द करण्यात आले. २०१५ मध्ये जीआयटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गेटतर्फे देण्यात आलेल्या प्रशिक्षणामार्फत उत्कृष्ट प्रदर्शन करून २०१६ सालच्या उद्योगांसाठी आपली कार्यक्षमता दाखविली आहे. गोगटे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे चेअरमन यु. एन. कालकुंद्रीकर, प्रा. डॉ. ए. एस. देशपांडे यांच्याकडे सदर प्रस्ताव सुपूर्द करण्यात आला. यामुळे जीआयटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि उद्योग क्षेत्रामध्ये प्राधान्य मिळण्यास वाव मिळणार आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सेवन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि केंद्रीय मानव संसाधन मंत्रालय यांच्या सहकार्यातून गेटतर्फे हा उपक्रम राबविला जातो. या उपक्रमांतर्गत यशस्वी विद्यार्थ्यांना १२४०० शिष्यवृत्ती दिली जाते. यावेळी प्रा. सतीश हुक्केरी व अन्य उपस्थित होते.